**Historicity Research Journal**
**Volume 2 | Issue 4 | Dec 2015**

**Impact Factor : 0.4521(UIF)**
**ISSN:- 2393-8900**

Research Article

# बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या काळातील सामाजिक स्वरूपाचे न्यायदान व धोरणे

*अंबादास मंजुळकर*

*एस.जी.के. कॉलेज, इतिहास विभाग प्रमुख, लोणी-काळभोर, पुणे.*

**सारांश :**

इ.सन १७०७ ते १८१८ हा मराठेशाहीचा कालखंड पेशवे कालखंड म्हणूनही इतिहासामध्ये ओळखला जातो. छ. शिवरायांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याची पुढील पायरी म्हणूनही मराठी कालखंडामध्ये पाहिले जाते. शिववछत्रपतींचा नातू छ. शाहू याने सातारा येथून राज्यकारभारास सुरुवात केली आणि मराठेशाहीच्या राजकारणासाठी सुरुवात केली. शिवछत्रपतीप्रमाणे राज्यकारभाराची आणि शौर्य पराक्रमाची उत्तुंग झेप शाहूच्या काळात नव्हती. म्हणूनच अष्टप्रधान मंडळातील पेशवेपदास महत्त्व मिळाले आणि पेशवाई सुरू झाली.

## प्रस्तावना:

पेशव्यांच्या कालखंडात शिवकालीन अनेक तत्वांचा अवलंबन पेशव्यांनी आपल्या राज्यकारभारात केला होता. न्यायदान क्षेत्रातही अशी तत्वे सांभाळली जात होती. महाराजांनी निर्माण केलेली न्यायव्यवस्था सर्वसामान्यांसाइी हितकारक होती. या काळातील न्यायव्यवस्थांच्या वैशिष्ट्यांची चर्चा एस.एन.सेन यांनी आपल्या ग्रंथात फार चांगली केलेली आहे.[१] न्यायदान व्यवस्थेचे बाळकडू शिवरायांना त्याच्या मातोश्री जिजाऊ यांच्याकडून मिळालेले होतेच. जिजाऊने स्वराज्याच्या वाटचालीत प्राथमिक अवस्थेत केलेल्या काही ठळक न्यायनिवाड्यावरून त्यांचे न्यायदान विषयक धोरण स्पष्ट होते. वेळप्रसंगी जिजाऊ शिवरायंना योग्य न्यायदानाबाबत मार्गदर्शन करीत असे. इ.सन १६४३-४४ मध्ये शिरवळ परगण्याबाबत जिजाऊने दिलेले न्यायदान आणि इ.सन १६५२ मध्ये मौजे बेहरखेडे येथे केलेले न्यायदान जिजाऊच्या न्यायविषयक कौशल्याची साक्ष देणारे ठरते. शिरवळ परगण्यातील लाखो विठ्ठल या देशकुलकर्ण्याच्या वारसांसाठी जिजाऊने दादोजी कोंडदेवांच्या न्यायदानाच्या तत्व पद्धतीला आव्हान देऊन एक नवा संदेश न्यायव्यवस्थेत निर्माण केला होता आणि कोणताही न्यायनिवाडा गीतसभेमार्फत व्हावा असा आदर्श घालून दिलेला होता. अशी माहिती प्राथमिक साधनांमधून हाती येते.[२] शहाजीराजांच्या काळात पुण्यामध्ये राहणाऱ्या गणोग बाजी यांचाही योग्य तो न्यायनिवाडा जिजाऊने केलेला होता. आणि संपूर्ण खटला समजावून घेऊन गणोगबाजीस त्याची जमिन परत देवदिली होती. ''जिजाऊसाहेब'' अशी अक्षरे ही आहेत.[३] अशारितीने जिजाऊंच्या न्यायविषयक कर्तबगारीचा वारसा महाराजांना लाभलेला होता व त्याच्याच छत्रछायेखाली पेशवेकाळात न्यायदान चालत होते.

याठिकाणी बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीतील सामाजिक न्यायदानाची काही उदाहरणे पाहणार आहोत. या काळामध्ये वतनाला महत्त्वाचे स्थान मिळाल्यामुळे पाटीलकी, देशमुखी या वतनाबाबतचे खटले जास्त मिळतात. वतनासाठी मारामाऱ्या व प्रसंगी खूनही पडत असत. इ.सन १७४१ मध्ये पंढरपूर जवळ असलेल्या कासेगाव या परगाव्यामध्ये खर्डी या गावी पाटीलकीच्या वादामधून न्यायदानासाठी दिव्य करावे लागले होते. दिव्य म्हणजे अमानवी कृत्य होय. असे अमानवी कृत्य खर्डी या गावी झालेले होते. आणि पाटीलकी वतनाचा निवाडा झालेला होता.[४] त्याकाळातील दिव्य म्हणजे उकळत्या तेलातून पैसे काढणे, निखाऱ्यावरून चालत जाणे, देवालयाच्या समोर अमानवी कृत्ये करणे होय. वतनासाठी असे दिव्य वारंवार होत असे. वतनाबाबत पाटील, देशपांडे, देशमुख इत्यादी वतनदारच न्यायालयाकडे धाव घेत. असे नसून सामान्य लोक बलुतेदार आणि शुद्र वर्णातील लोकही या प्रक्रियेत अडकलेले दिसतात. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत पुणे या ठिकाणी न्हावी वतनाचा, वाद झालेला होता यास मेहसरकीत वतनाचा आहे. असेही म्हटले जाते एका न्हाव्याचे वतन दुसऱ्याने लाटले होते. म्हणून हा तंटा पेशव्यांचे लहान बंधू चिमाजी अप्पा यांच्यापुढे गेलेला होता. त्याचा योग्य तो निवडा करून चिमाजी आप्पांनी न्याय दिल्याचा पुरावा मिळतो.[५] या पुराव्यावरून सर्वसामान्य लोक योग्य न्यायासाठी पेशव्यांकडे धाव घेत होते हे लक्षात येते. चिमाजी आप्पांच्याच पुढे महारकीच्या उत्पन्नाबाबत आलेला वाद बराच गाजलेला होता. पुण्याजवळच्या पुरंदर किल्ल्याच्या परिसरातील काही महारांनी पेशव्यांकडे तक्रार केलेली होती. हा वाद असा होता, पुरंदर किल्ल्याच्या घेऱ्यात

असणाऱ्या (आसपास असणाऱ्या) जमिनीवर जी गुरे मरतील ती पुरंदर गावच्या महारांना रिवाजाने मिळत असत. असे असताना किल्ल्याच्या घेऱ्याबाहेर असणारे आजूबाजूच्या गावातील महारदेखील अशा उत्पन्नावर हक्क सांगू लागले. म्हणून हा खटला पेशवे दरबारात गेला होता. त्यावर निकाल दिला तो असा की पुरंदरच्या घेऱ्यातील लोकांनीच हे उत्पन्न घ्यावे. बाकी लोकांनी त्यावर हक्क सांगू नये. तसेच बाकीचे महार लोक पुरंदर घेऱ्यात का आले याचा शोध घ्यावा.[६] यावरून पेशवेकाळात समान्य लोकांनाही योग्य ते न्यायदान मिळत असे हे स्पष्ट होते.

मोठमोठी वतने त्या काळात मिळत होते. असे नसून लहान लहान व अधिकाराचीही वतने असत. नानासाहेबांच्या काळात दरवेशी वतन पुण्या जवळील हवेली येथील शेत इमाम, रुस्तम व दावल यांना दिले होते. माणसाळलेले वाघ व अस्वले यांचा खेळ करून चार पैसे कमविणाऱ्यास दरवेशी म्हणत. मात्र अशा वतनामध्येही कुलकर्णी, पाटील, देशमुख लक्ष घालून ते वतन दुसऱ्याला देवून पैसे कमावत असत. या बाबतची माहिती एकूण ८ पत्रावरून मिळते. ही आठ पत्रे ओतुरकर स.बि. यांच्या ग्रंथात मिळतात.[७] अशाच रितीचे अनेक सामजिक स्वरुपाचे खटले पेशव्याकडे येत असत. उदा. होळीच्या गोवऱ्या कोणी घ्यायचा? नदीमध्ये नाव कोणी चालवायची? इ. पेशवेकालीन न्यायव्यवस्था तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचली होती हे वरील उदा. वरून समजते.

नानासाहेब पेशव्यांच्या काळात इ.स. १८५६ ला एक वाद झाला होता. सोलापूर व अकोले या गावठाण्यात लखन सावकार सावकारी करीत होता. त्यास मदत करणारे बरेच होते. मात्र तो मरण पावल्यावर त्याची सून राणाई हिस खूप त्रास होवू लागला. मृत सावकाराचे मदतनिस सुनेला त्रास देवू लागले. तिच्याकडून जबरीने किल्ल्या घेवून दुकान उघडून आतील संपत्ती नेली. तेव्हा अशा मुजोर मदतनिसांना पकडा व त्यांचे पारिपत्य करा. असा निवाडा पेशव्यांनी दिला होता.[८] पुण्याजवळ संताजी थोरात यांचे घर चोरट्यांनी लुटले. लुटारू मावजी वाघ व चिलोजी वाघ यंना न्यायालयात हजर रहाण्याचा हुकूम झाला, पण तो पळाला नाही. तेव्हा गुन्हेगारांना पकडून आणण्यासाठी दोन ढालाईत बडेखान व अब्दुल्ला यांना पाठविले होते. या ढालाईतांना प्रत्येकी १०० रु. देण्याची आज्ञा झाली होती.[९]

अशारितीने नाना साहेबांच्या काळात सामाजिक स्वरूपाचे न्यायदान योग्यरितीने घडत होत हे दिसते. अगदी बारिक सारिक विषय देखील न्यायासनासमोर येत असत. भूत, जादूटोणा, करणी, गावातील उत्सव, बाजार भाव विवाह, काडीमोड, पुनर्विवाह इ. विविध विषय न्यायदानासाठी येत अत. समाज घारणा बिघडणार नाही, धर्म जतन केला जाईल व जनतेच्या भावना दुखावल्या जाणार नाही. मात्र खरा गुन्हेगार सुटणार नाही. अशातत्वाने नानासाहेबांच्या काळात न्याय निवाडे होत असत.

## *संदर्भसूची :-*

१)'ॲडमिनीस्ट्रेटिव्ह सिस्टिम ऑफ दी मराठाज'- एस.एन.सेन, के.पी. बागची आणि कंपनी, कलकत्ता १९७९, तिसरी आवृत्ती, पृ. २१२ ते २२४.
२)'शिवचरित्र साहित्य खंड-२', भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, पृ. १३९.
३)त्रैमासिक भारत इतिहास, संशोधक मंडळ, पुणे, वर्ष-१, पृ. २,३, इ.स. १९३०.
४)पुणे लेखाभिगार, पुणे, शाहू दफ्तर रुमाल क्र. १, फडके क्र. १५, पत्र क्र. ४२९.
५)पुणे लेखाभिगार, पुणे, सं.नि.का. दफ्तर क्र. २, पुडके क्र. ४, पत्र क्र. १२५७.
६)पुणे लेखाभिगार, पुणे सं.नि.का. दफ्तर क्र. ३, पुडके क्र. १, पत्र क्र. १४६१.
७)सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार (पेशवेकालीन) ओतुरकर स.वि., भा.इ.स. मंडळ पुणे १९५०, पृ. ३४ ते ४०.
८)पुणे लेखाभिगार, पुणे शाहू दप्तर क्र. ४, पुडके क्र. ३, पत्र क्रमांक ३६६६.
९)पुणे लेखाभिगार, पुणे, शाहू दप्तर क्र. ५, फडके क्र. ४, पत्र क्र. ४७८०.